28 NOV 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय संविधान हेच देशाचे पथदिग्दर्शक जीपीएस

## डॉ. श्रीरंजन आवटे : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : 'भारतीय संविधान हेच आपल्या देशाचे पथदिग्दर्शक जीपीएस आहे. त्यामुळे या संविधान निर्मितीचा खरा इतिहास समजून घेणे, हाच विकसित भारताकडे जाण्याचा योग्य मार्ग आहे', असे प्रतिपादन पुणे येथील राज्यशास्त्र व भारतीय संविधानाचे अभ्यासक डॉ. श्रीरंजन आवटे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत 'भारतीय संविधान आणि विकसित भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे होते.

डॉ. आवटे म्हणाले, 'डिजिटल मॅप्समध्ये जशी ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (जीपीएस) ही नेव्हिगेशनसाठी वापरली जाते, त्याचप्रमाणे भारत देशाचा नागरिक म्हणून आपल्या व्यक्तिगत आणि सामूहिक नेव्हिगेशनला दिशा देणारे आणि योग्य दिशेने नेणारे संविधान हे आपल्या देशाचे जीपीएस आहे. या अंगाने संविधानाचा परिचय विद्यार्थ्यांना, नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे. संविधानाने प्रत्येकाला मताधिकार देऊन हरेक व्यक्तीचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग अधोरेखित केला ही फार मोठी बाब आहे. बहुसंख्य समाज अशिक्षित असला तरी त्या समाजाच्या सामूहिक शहाणपणावर संविधानकर्त्यांचा पूर्ण विश्वास होता. हे सामूहिक समंजसपण जपणे आजपर्यंत अत्यंत महत्त्वाचे आहे.'

डॉ. मोरे म्हणाले, 'संविधानामध्ये देशातील सर्व घटकांच्या आवाजाची दखल असून, त्याची लोकाभिमुखता ही फार मौलिक बाब आहे.'

डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, तानाजी चौगुले, अविनाश सप्रे, प्रकाश पवार, अवनिश पाटील, प्रकाश कांबळे आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात व्याख्यानात बोलताना डॉ. श्रीरंजन आवटे.

### पोस्टर प्रदर्शनाला प्रारंभ

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित पोस्टर प्रदर्शनाचा आज प्रारंभ झाला. उद्या, गुरुवारी सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे 'भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावर व्याख्यान होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 NOV 2024
लोकमत

डॉ. श्रीरंजन आवटे : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

# भारतीय संविधान हेच देशाचे पथदिग्दर्शक जीपीएस

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतीय संविधान हेच आपल्या देशाचे पथदिग्दर्शक जीपीएस आहे. त्यामुळे या संविधान निर्मितीचा खरा इतिहास समजून घेणे हाच विकसित भारताकडे जाण्याचा योग्य मार्ग आहे, असे प्रतिपादन पुणे येथील राज्यशास्त्र व भारतीय संविधानाचे अभ्यासक डॉ. श्रीरंजन आवटे यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठात भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत 'भारतीय संविधान आणि विकसित भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. मराठी



अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. आवटे म्हणाले, भारत देशाचा नागरिक म्हणून आपल्या व्यक्तिगत आणि सामूहिक नेव्हिगेशनला दिशा देणारे व योग्य दिशेने नेणारे संविधान हे आपल्या देशाचे जीपीएस आहे, या अंगाने संविधानाचा परिचय विद्यार्थ्यांना, नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे. बहुसंख्य समाज अशिक्षित असला तरी त्या समाजाच्या सामूहिक शहाणपणावर संविधानकर्त्यांचा पूर्ण विश्वास होता. हे सामूहिक सामंजसपण जपणे आजघडीला अत्यंत महत्त्वाचे आहे. संविधानकर्त्यांनी विकसित भारताची संकल्पनाच संविधानाच्या प्रत्येक कलमामध्ये मांडून ठेवली आहे. त्या संविधानामधील आशय जपला जाईल आणि त्या माध्यमातून देशातील समग्र घटकांचे हित साधले जाईल, याची दक्षता घेण्याची जबाबदारी व्यवस्थेवर आहे. डॉ. नंदकुमार मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. अविनाश सप्रे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रकाश कांबळे उपस्थित होते. दरम्यान, मानव्यशास्त्र इमारतीमध्ये संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत विशेष पोस्टर प्रदर्शनाचे डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते उद्घाटन झाले. हे प्रदर्शन ३० नोव्हेंबरपर्यंत पाहण्यास खुले राहील.

जनसंपर्क कक्ष
...जी विद्यापीठ, कोल्हापूर
28 NOV 2024
लोकमत

# एलएल.बी.साठी प्रवेश नाकारला

## 'भाविमो'चे आंदोलन : अपुऱ्या हजेरीमुळे केले अपात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात तीन आणि पाच वर्षे एलएल.बी. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अपुऱ्या हजेरीमुळे अपात्र करण्यात आले असून, त्यांना पुढील वर्षालाही प्रवेश नाकारला आहे. त्यामुळे भारतीय विद्यार्थी मोर्चाच्या वतीने बुधवारी शहाजी विधि महाविद्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

एटीकेटी, कॅरीऑनसारख्या विशेष उपाययोजना असतानाही महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना परीक्षा देणे किंवा पुढील वर्गामध्ये प्रवेश देण्यासंदर्भात कोणतीच उपाययोजना केलेली नाही. संबंधित विद्यार्थ्यांची दोन वर्षे वाया जाणार असल्याने विद्यार्थी मोर्चाने धरणे आंदोलन करून महाविद्यालय प्रशासनाचे लक्ष वेधले.

सहा महिने उलटूनदेखील अपात्र सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांना अद्यापही पुढील सेमिस्टरला प्रवेश नाकारला आहे.



विधि अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अपुऱ्या हजेरीमुळे प्रवेश नाकारण्यात आल्याने बुधवारी भारतीय विद्यार्थी मोर्चाच्या वतीने कोल्हापुरातील शहाजी विधि महाविद्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, याकरिता कॉलेज प्रशासन आणि संबंधित विभाग यांनी त्यांच्या अधिकारातून योग्य ती उपाययोजना करावी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष प्रथमेश कांबळे, डॉ. उल्हास त्रिरत्ने, विजय कौशल, साक्षी पाटील, तृप्ती माने, स्नेहल लावंड, सुजाता पाटील, साहिल शिंदे, रेश्मा गायकवाड, किरण के. के, महेश बावडेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 NOV 2024
सकाळ

# 'एलएलबी' अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्या

## भारतीय विद्यार्थी मोर्चाची मागणी

कोल्हापूर, ता. २७ : तीन आणि पाच वर्षे एलएलबी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अपुऱ्या हजेरीमुळे अपात्र करण्यात येऊ नये. त्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन त्यांना पुढील सत्राला प्रवेश द्यावा, अशी मागणी भारतीय विद्यार्थी मोर्चा या संघटनेतर्फे करण्यात आली. या मागणीसाठी संघटनेने आज शहाजी लॉ कॉलेजसमोर धरणे आंदोलन केले.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात तीन आणि पाच वर्षे एलएलबी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अपुऱ्या हजेरीमुळे अपात्र करण्यात आले आहे. त्यांना पुढील वर्षालाही प्रवेश नाकारलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची एक-दोन वर्षे वाया जाणार आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, याकरिता कॉलेज प्रशासन आणि संबंधित विभाग यांनी त्यांच्या अधिकारातून योग्य ती उपाययोजना करावी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी भारतीय विद्यार्थी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रथमेश कांबळे, डॉ. उल्हास त्रिरले यांनी केली. त्यांनी या मागणीचे निवेदन कॉलेज प्रशासनाला दिले आहे. यावेळी विजय कौशल, साक्षी पाटील, तृप्ती माने, स्नेहल लावंड, सुजाता पाटील, साहिल शिंदे, रेश्मा गायकवाड उपस्थित होते.



कोल्हापूर : भारतीय विद्यार्थी मोर्चातर्फे शहाजी लॉ कॉलेजच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन करण्यात आले.

'या अभ्यासक्रमाच्या संबंधित विद्यार्थ्यांची हजेरी पूर्ण भरलेली नाही. कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठाला दिलेल्या निवेदनातदेखील या विद्यार्थ्यांनी ते मान्य केले आहे. त्यांची मागणी बेकायदेशीर आहे. या विद्यार्थ्यांना त्यांची हजेरी पूर्ण करण्याचा मार्ग सांगितला आहे.

**- डॉ. प्रवीण पाटील**, प्राचार्य, शहाजी लॉ कॉलेज

28 NOV 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

येत्या शैक्षणिक वर्षापासून नव्या अभ्यासक्रमांची सुरुवात

# ‘आयआयएम मुंबई’त पार्टटाइम आणि ऑनलाइन एमबीए

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आयआयएम मुंबईमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून आणखी नवे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. त्यामध्ये एमबीए इन इनोव्हेशन अँड एंटरप्रेनरशिप हा नवा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ऑनलाइन आणि पार्टटाइम अशा दोन्ही पद्धतीचे एमबीए अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने आयआयएम मुंबईने तयारी पूर्ण केली असून, पुढील शैक्षणिक वर्षापासून हे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत.



देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत गेल्याच वर्षी सुरू झालेल्या आयआयएम मुंबई या संस्थेने आता नव्या काळाला सुसंगत असे अभ्यासक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. उद्योगविश्वाला पूरक अभ्यासक्रम राबवून येथील आर्थिक भरभराटीला चालना देण्याच्या दृष्टीने काही नवे अभ्यासक्रम या संस्थेत शिकविले जाणार आहेत. उद्योगविश्वातील आणि कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नोकरी सोडून पूर्णवेळ नियमित वर्गांना प्रवेश घेऊन पुढील उच्च शिक्षण घेणे शक्य नसते. आता त्यांना आयआयएम मुंबईतून एमबीएचे शिक्षण घेता येणार आहे. त्यासाठी आयआयएम मुंबईकडून ऑनलाइन एमबीए अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. येत्या जानेवारीपासून हा अभ्यासक्रम सुरू होणार असून, त्यांची प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. त्याचबरोबर येत्या शैक्षणिक वर्षापासून पार्टटाइम एमबीए अभ्यासक्रमही सुरू करण्याचा मानस आहे, असे आयआयएम मुंबईचे संचालक प्रा. मनोजकुमार तिवारी यांनी नमूद केले. या पार्टटाइम एमबीएमधील काही अभ्यासक्रमाच्या तासिका या शनिवारी आणि रविवारी घेतल्या जाणार आहेत. त्यातून काम करून शिकणाऱ्यांना नियमित वर्गांना प्रवेशित होणे शक्य होणार आहे.

दरम्यान, आयआयएम मुंबईमध्ये इनोव्हेशन अँड एंटरप्रेनरशिप हा नवा कोर्स सुरू केला जाणार आहे. त्याचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून मार्चपासून हा कोर्स सुरू होणार आहे.

## व्हिडीओच्या माध्यमातून प्रशिक्षण

डाटा ड्रिव्हन सप्लाय चेन, जनरेटिव्ह एआय, आयओटी ड्रिव्हन आदी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानावरील आणि इंडस्ट्री फ्रेंडली विविध प्रकारचे अभ्यासक्रम व्हिडीओच्या माध्यमातून आयआयएम मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हे अभ्यासक्रम एक किंवा दोन क्रेडिटचे असून तब्बल २५००० लोकांनी या व्हिडीओच्या माध्यमातून शिक्षण घेतले आहे, असेही तिवारी यांनी सांगितले.

28 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या पिढीला संविधानाचा परिचय गरजेचा

## - डॉ. श्रीरंजन आवटे

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

भारतीय संविधान हेच आपल्या देशाचे पथ दिग्दर्शक आहे. त्यामुळे या संविधानाचा परिचय नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे येथील राज्यशास्त्र व भारतीय संविधानाचे अभ्यासक डॉ. श्रीरंजन आवटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत 'भारतीय संविधान आणि विकसित भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे होते.

डॉ. आवटे म्हणाले, देशाला योग्य दिशेने नेणारे संविधान हे आपल्या देशाचे जीपीएस आहे. संविधानाने प्रत्येकाला मताधिकार देऊन व्यक्तीचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग अधोरेखित केला आहे. बहुसंख्य समाज अशिक्षित असला, तरी त्या समाजाचा संविधानावर पूर्ण विश्वास होता. संविधानामधील आशय जपला जाईल आणि त्या माध्यमातून देशातील समग्र घटकांचे हित साधले जाईल, याची दक्षता घेण्याची जबाबदारी व्यवस्थेवर आहे. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन संसाधनांचे न्याय वाटप हे भारतीय समाजवादाचे वैशिष्ट्य आहे.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी संविधानामध्ये देशातील सर्व घटकांच्या आवाजाची दखल असून त्याची लोकाभिमुखता ही फार मौलिक बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. अविनाश सप्रे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनिश पाटील, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. चंद्रकांत लंगरे आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. श्रीरंजन आवटे. छायाचित्रात डावीकडून डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे. (छाया : मीलन मकानदार)

## प्रदर्शन ३० नोव्हेंबरपर्यंत...

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत विशेष पोस्टर प्रदर्शनाचे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते उद्घाटन झाले. 'भारतीय संविधानिक मूल्ये आणि शिक्षण' या संकल्पनेवरील २० हून अधिक पोस्टर विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केली आहेत. हे प्रदर्शन ३० नोव्हेंबरपर्यंत पाहण्यास खुले राहणार आहे.

28 NOV 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय संविधान हेच देशाचे पथदिग्दर्शक जीपीएस : डॉ. श्रीरंजन आवटे

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारतीय संविधान हेच आपल्या देशाचे पथदिग्दर्शक जी.पी.एस. आहे. त्यामुळे या संविधान निर्मितीचा खरा इतिहास समजून घेणे, हाच विकसित भारताकडे जाण्याचा योग्य मार्ग आहे, असे प्रतिपादन पुणे येथील राज्यशास्त्र व भारतीय संविधानाचे अभ्यासक डॉ. श्रीरंजन आवटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत 'भारतीय संविधान आणि विकसित भारत' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

डॉ. आवटे म्हणाले, डिजिटल मॅप्समध्ये जशी ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (जीपीएस) ही नेव्हिगेशनसाठी वापरली जाते, त्याचप्रमाणे भारत देशाचा नागरिक म्हणून आपल्या व्यक्तिगत आणि सामूहिक




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. श्रीरंजन आवटे. सोबत मान्यवर.

नेव्हिगेशनला दिशा देणारे आणि योग्य दिशेने नेणारे संविधान हे आपल्या देशाचे जीपीएस आहे, या अंगाने संविधानाचा परिचय विद्यार्थ्यांना, नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे. संविधानाने प्रत्येकाला मताधिकार देऊन हरेक व्यक्तीचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग अधोरेखित केला ही फार मोठी बाब आहे.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, संविधानामध्ये देशातील सर्व घटकांच्या आवाजाची दखल असून, त्याची लोकाभिमुखता ही फार मौलिक बाब असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक करून वक्त्यांचा परिचय करून दिला. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

## डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे व्याख्यान

संविधान अमृतमहोत्सव सप्ताहांतर्गत गुरुवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे 'भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता' या विषयावर मानव्यशास्त्र सभागृहात व्याख्यान होईल.

अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. अविनाश सप्रे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. कैलास सोनावणे, विलास सोयम, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. विद्यानंद खंडागळे, अविनाश भाले, डॉ. किशोर खिलारे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 NOV 2024
तरुण भारत

# समिक्षा शेलारने ज्युदो स्पर्धेत मिळवले रौप्य पदक

**कोल्हापूर :** शहाजी छत्रपती महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय ज्युदो खेळाडू समिक्षा शेलार हिने मध्य प्रदेशातील भोपाळ येथील साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी ज्युदो स्पर्धेत रौप्य पदक मिळविले आहे. तसेच तिची निवड अखिल भारतीय अंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी झाली. या यशासाठी तिला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, जिमखानाप्रमुख डॉ. प्रशांत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

